। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक २४४ वा । गुरूवार दिनांक ११ डिसेंबर, २०२५ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹
RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### सोन्या व चांदीचे दागिने असा पाच लाखाच्या मालाची चोरी

वाशी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी श्रीमती सविता खंडू ढोपे, वय ५० वर्षे, रा.ईट ता. भुम जि.धाराशिव यांचे राहते घराचे कुलूप अज्ञात व्यक्तीने दि.२९.११.२०२५ रोजी तोडून आत प्रवेश करुन घरातील ७५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व चांदीचे दागिने असा एकुण ५,००,००० किंमतीचा माल चोरुन नेला.अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- श्रीमती सविता ढोपे यांनी दि.०९.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन वाशी पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### तुळजापूर बसस्थानकातून लॉकेटची चोरी

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी निखील गौतम हावळे वय २९ वर्षे, रा. रा. प्लॉट नं १० अ, बिलाल नगर सोलापूर हे दि. ०४.१२.२०२५ रोजी तुळजापूर बसस्थानक येथे बसमध्ये चढत असताना निखली हावळे यांचे गळ्यातील १७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे लाकेट अंदाजे ९०,००० किंमतीचे हे अज्ञात व्यक्तीने गर्दीचा फायदा घेवून चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- निखील हावळे यांनी दि.०९.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### नव्वद हजाराच्या तीन म्हैसची चोरी

तामलवाडी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी आनंद बबन गाटे, वय ४८ वर्षे, रा. दहिवडी ता. तुळजापूर जि. धाराशिव यांचे दहिवडी शिवारातील शेतात शेडच्या बाजूला बांधलेले तीन म्हैस ९०,००० किंमतीच्या या दि. २८.११.२०२५ रोजी अज्ञात व्यक्तीने चोरुन नेल्या.अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- आनंद गाटे यांनी दि.०९.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तामलवाडी पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### सोने, चांदी व रोख रक्कम हिसकाऊन घेऊन पसार

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी माउली महादेव ताटे, वय ३४ वर्षे, रा.केमवाडी ता. तुळजापूर जि.धाराशिव व त्यांचे साथीदार असे सिंदफळ फाटा तेलातुर जाणारे बायपास रोडजवळ तुळजापूर येथुन जात होते दरम्यान अज्ञात तीन व्यक्तींनी फिर्यादी यांना रोडचे कडेला घेवून त्यांचे कडील सोन्याचे दागिने, चांदीचे दागिने व रोख रक्कम ३५,००० असा एकुण ५०,००० किंमतीचा माल हिसकावुन घेरवून पळून गेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- माउली ताटे यांनी दि.०९.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०४(२), ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

# दिव्यांग बांधवांचे कोणतेही प्रश्न यंत्रणांकडे प्रलंबित राहू नये-जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार

## दिव्यांगांप्रती संवेदनशीलता व जाणीव जागृती कार्यशाळा

धाराशिव (जिमाका),- दिव्यांगांचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी सर्व विभागाचा समन्वय असणे आवश्यक आहे. दिव्यांग हक्क अधिनियम हा कायदा देखील आहे. या कायद्याने त्यांचे मूलभूत अधिकार व कर्तव्य हे निश्चित केले आहे. दिव्यांग बांधव हा समाजाचा एक महत्त्वाचा घटक आहे. दिव्यांग बांधवांना विविध योजनांचा लाभ मिळवून देताना त्यांचे कोणतेही प्रश्न यंत्रणांकडे प्रलंबित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी केले.

बुधवारी जिल्हा नियोजन समिती सभागृहात दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ कलम ३९ अन्वये दिव्यांगाप्रती संवेदनशीलता जागृती कार्यशाळेत अध्यक्षस्थानावरून श्री. पूजार बोलत होते. यावेळी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या सचिव न्या.भाग्यश्री पाटील, केंद्र सरकारच्या दिव्यांग व्यक्ती सशक्तीकरण समितीचे सदस्य सुरेश पाटील, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश काळे, निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी देवदत्त गिरी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश हरिदास, जिल्हा परिषदेचे मुख्य वित्त व लेखा अधिकारी सचिन इगे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) नागेश मापारी, कौशल्य विकास विभागाचे सहाय्यक आयुक्त संजय गुरव, नवजीवन अपंग प्रशिक्षण संस्थेचे संस्थापक चंद्रकांत जाधव, महाराष्ट्र राज्य दिव्यांग संघटनेचे संस्थापक अध्यक्ष आप्पा ढोके व प्रहार संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष मयूर काकडे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

श्री.पूजार म्हणाले की, विविध योजनांचे अभिसरण करून दिव्यांग बांधवांना योजनांचा लाभ देण्यात येणार आहे. विविध आरोग्यविषयक शिबिरांचे त्यांच्यासाठी आयोजन करण्यात येत असून यामधून त्यांना दिव्यांग वैश्विक ओळखपत्र देण्यात येत आहे. दिव्यांग बांधवांना लागणाऱ्या सहायक उपकरणांसाठी शिबिरांचे देखील आयोजन करण्यात येत आहे. दिव्यांग बांधव योजनांच्या लाभांपासून वंचित राहणार नाही याचा प्रयत्न करण्यात येत आहे, असे त्यांनी सांगितले.

जिल्ह्यात दिव्यांग बांधवांसाठी पुनर्वसन केंद्र लवकर सुरू करण्यात येणार असल्याचे सांगून श्री.पुजार म्हणाले की, दिव्यांग बांधव स्वतःच्या पायावर उभे राहिले पाहिजे,यासाठी त्यांना कौशल्यविषयक प्रशिक्षण दिले पाहिजे. प्रत्येक कार्यालयात त्यांच्यासाठी आवश्यक सुविधा निर्माण कराव्यात. ग्रामपंचायतला देण्यात येणारा ५ टक्के निधी दिव्यांगांसाठी खर्च करावा. त्यांना घरपोच आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात, असे श्री. पुजार यावेळी म्हणाले.

न्या. श्रीमती पाटील म्हणाल्या की, प्रशासन हे दिव्यांगाबाबत सजग आहे. हे आजच्या कार्यशाळेतून दिसून येते. दिव्यांगांचे प्रश्न सोडविण्यात अडचणी येत असतील तर त्या दूर करून त्यांचे प्रश्न सोडविण्यात येतील. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या माध्यमातून दिव्यांगांचे प्रश्न सोडविण्यासाठी कार्यशाळा आयोजित करण्यात येईल. समाजात सकारात्मकता जागरूक ठेवण्याचे काम दिव्यांग बांधव करत आहेत. मोफत विधी सेवा देऊन काम संपत नाही तर समाजातील वंचित व दुर्लक्षित घटकांपर्यंत योजना पोहोचविण्याचे काम विधी सेवा प्राधिकरणच्या माध्यमातून करण्यात येत असल्याचे श्रीमती पाटील यांनी यावेळी सांगितले.

श्री.सुरेश पाटील म्हणाले की, शासनाच्या दिव्यांगांसाठी विविध योजना आहेत. त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी. सन २०१६ मध्ये आलेल्या दिव्यांग हक्क अधिनियमात २१ प्रकारच्या दिव्यांग प्रवर्गाचा समावेश करण्यात आला आहे. आज अनेक दिव्यांग व्यक्ती असे आहेत की, ज्यांच्याकडे वैश्विक दिव्यांग ओळखपत्र नाही, ते त्यांना मिळून दिले पाहिजे. शासनाने विविध विभागाच्या मदतीने दिव्यांगाचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. ६ टक्के दिव्यांग व्यक्ती आहेत. हा घटक वंचित व दुर्लक्ष राहीला.आता त्यांना दुर्लक्षित वंचित ठेवता येणार नाही. समाजाने या घटकाकडे संवेदनशीलतेने बघितले पाहिजे. दिव्यांगाकडे बघण्याचा दृष्टिकोन हा समान असला पाहिजेअसे श्री.पाटील म्हणाले.

दिव्यांगांना योग्य वागणूक मिळाली नाही तर शिक्षेची तरतूद सुद्धा असल्याचे सांगून श्री.पाटील म्हणाले की, त्यामुळे या विषयाकडे संवेदनशीलतेने बघण्याची



आवश्यकता आहे. दिव्यांगाना विविध कार्यालयात जाण्यासाठी रॅम्स व लिफ्टची सुविधा असली पाहिजे.आपल्या अवतीभवती दिव्यांगांच्या अनेक समस्या असल्याचे दिसून येईल. दिव्यांगाना मदत करण्यासाठी आपण सहाय्यभूत ठरलो पाहिजे,असे त्यांनी सांगितले.

डॉ.हरिदास म्हणाले की, जिल्ह्यात ज्या व्यक्तींचे आयुष्यमान कार्ड काढणे बाकी आहे, त्यांनी तात्काळ आयुष्यमान कार्ड काढून घ्यावे.ज्यांनी ईकेवायसी केली नाही त्यांनी केवायसी करावी. आयुष्यमान कार्ड सर्वांना काढता येतात. या कार्डमुळे ५ लक्ष रुपयांपर्यंतचे उपचार खाजगी रुग्णालयात देखील मोफत मिळणार आहे. कुटुंबांसाठी एक आणि वृद्ध व्यक्तींसाठी वेगळे कार्ड काढता येतात. दिव्यंगत्व जन्मजात येऊच नये यासाठी मुल पोटात असतानाच काळजी घेतली पाहिजे.टिनऐजमध्ये जीवनशैलीची दक्षता घेतली पाहिजे. रक्तक्षयाचे प्रमाण आज वाढले आहे. मुलींमध्ये हे प्रमाण जास्त असल्याने जन्माला येणारे बालक हे देखील विकलांग असण्याची शक्यता असते. त्यामुळे बाळ जन्माला येण्याआधी त्याचे दिव्यांगत्व टाळण्याचा प्रयत्न करण्यात येते, असे डॉ.श्री.हरिदास यांनी सांगितले.

अस्थिरोग तज्ञ डॉ.संतोष पाटील म्हणाले की, तालुक्याच्या ठिकाणी आणि जिल्ह्याच्या ठिकाणी दिव्यांगाची तपासणी एका निश्चित तारखेला करण्यात येते. दिव्यांग व्यक्तीचे वैश्विक दिव्यांगत्व ओळखपत्र काढले पाहिजे, ज्यांनी काढले नसतील त्यांना ते कार्ड काढण्यासाठी मदत करावी. दिव्यांग व्यक्तीला शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळाला पाहिजे. केवळ ४० टक्के दिव्यांग व्यक्तीला नाही तर त्यापेक्षा कमी दिव्यांगत्व प्रमाण असलेल्या व्यक्तीला सुद्धा दिव्यांग प्रमाणपत्र मिळाले पाहिजे व विविध योजनांचा लाभ मिळाला पाहिजे. अधिकारी कर्मचाऱ्यांनी दिव्यांग बांधवांना विविध योजनांची माहिती दिली पाहिजे, असं त्यांनी सांगितले.

दुपारच्या सत्रात समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त श्री.अविनाश देवसटवार यांनी सांगितले की,दिव्यांगांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलणे ही काळाची गरज आहे.

दिव्यांगांना मदत करण्यासाठी सकारात्मक भावनेतून काम करणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले.कौशल्य विकास विभागाचे सहाय्यक आयुक्त श्री.गुरव यांनी त्यांच्या विविध योजनांची माहिती देऊन दिव्यांग बांधवांनी कौशल्यविषयक प्रशिक्षण घेऊन रोजगार उभारून स्वावलंबी होण्याचे आवाहन केले. जिल्हा शीघ्र हस्तक्षेप केंद्राचे डॉ.पंकज शिनगारे यांनी या केंद्रामार्फत राबविण्यात येत असलेल्या कामकाजाची माहिती दिली. श्री.व्यंकट लामजाने यांनी देखील दिव्यांगांसाठी असलेल्या विविध योजनांची व उपक्रमांची माहिती दिली.दिव्यांग व्यक्ती श्री.गायकवाड यांनी कविता सादर केली.

दिव्यांग बांधवांचे प्रतिनिधी श्री.काशिनाथ शिंदे यांनी दिव्यांगांवर होणाऱ्या अन्याय थांबवावे, ग्रामपंचायतला देण्यात येणारा ५ टक्के निधीचा वापर दिव्यांग बांधवांच्या कल्याणासाठी व्हावा.घरकुल योजनेचा लाभ त्यांना देण्यात यावा.दिव्यांगांचे प्रमाणपत्र देताना पारदर्शकता असावी. बँकांनी रोजगारासाठी कर्ज उपलब्ध करून द्यावे. दिव्यांगाचे आयुष्यमान कार्ड काढण्यात यावे, एसटी बसेसमध्ये दिव्यांगासाठी राखीव सीटवर दिव्यांग व्यक्तीला बसण्याची व्यवस्था करावी.वैश्विक दिव्यांग ओळखपत्र तयार करून द्यावे, असे त्यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले.

कार्यशाळेला विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी तसेच दिव्यांग क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांचे कर्मचारी, दिव्यांग संघटनेचे विविध पदाधिकारी या कार्यशाळेला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते लुईस ब्रेल आणि हेलन केलर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून दीप प्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन वैशाली आव्हाड यांनी केले. उपस्थितांचे आभार जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण विभागाचे वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता सच्चिदानंद बांगर यांनी मानले.

# गंधोरा पाटी येथे चोरीच्या घटना: गुन्ह्याची नोंद

नळदुर्ग(प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत दि.१७.१०.२०२४ रोजी गंधोरा पाटी येथील अज्ञात व्यक्तीने कन्व्हर्टर पॅन, क्सेसरीज, सर्व कंट्रोल्स, सेफ्टी चैन, व सप्लाय केबल, रोटर पावर केबल २ नग कन्व्हर्टर पॅनलचे ०४ जी व ०५ केबल्स, नेटवर्क केबल, कोअर १५ मिटर स्काडा केबल्स व टावर केबल लीमीट स्वीच १२ मीटर केबल, अर्था‍ग स्ट्रीप ४०० उमउम, लिमिट स्वीच लिफ्ट सप्लाय केबल व क्सेसरीज एकुण १,००,००० किंमतीचे चोरुन नेले.अशा मजकुराच्या फिर्यादी रावसाहेब भानुदास शेंडे, वय ४३ वर्षे, रा. हरोली ता. कवठे, महाकाळ जि. सांगली ह.मु. एस टी कॉलनी तुळजापूर ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.०८.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन नळदुर्ग पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

तसेच दि. ०९.१०.२०२४ रोजी गंधोरा पाटी येथील आर एस एल २७ ट्रान्सफार्मर मधील आईल व यु उस उस ट्रान्सफार्मर मधील सर्व क्सेसीरीज असा एकुण ९५,००० किंमतीचा माल अज्ञात व्यक्तीन चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- रावसाहेब भानुदास शेंडे, वय ४३ वर्षे, रा. हरोली ता. कवठे, महाकाळ जि. सांगली ह.मु. एस टी कॉलनी तुळजापूर ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.०८.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन नळदुर्ग पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

तसेच दि.०१.०६.२०२४ रोजी २३.०० ते दि.०२.०६.२०२५ रोजी ०५.०० वा. सु. सलगरा ते शिमदरा तांडा २.५ कि. मी. येथील आर एस एल ६८ ते ३३ के. व्ही सबस्टेशन दरम्यानच्या सुमारे २.५ कि.मी. लांबीच्या विज वाहिन्या एकुण ९०,००० किंमतीच्या अज्ञात व्यक्तीने चोरुन नेल्या. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- रावसाहेब भानुदास शेंडे, वय ४३ वर्षे, रा. हरोली ता. कवठे, महाकाळ जि. सांगली ह.मु. एस टी कॉलनी तुळजापूर ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.०८.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन नळदुर्ग पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

तसेच दि.२४.०२.२०२५ रोजी चिवरी ते आरळी तसेच हगलुर ते मानेवाडी या गावाच्या हद्दीमधून रिन्यु ग्रीन एनर्जी सोल्युशन्स प्रा.लि. या कंपनीमार्फत उभे करण्यात आलेल्या आर.उस.उल. २४ ते २२ जोडण्यासाठी पॅन्थर लाईन विज वाहीनीचे ८ पोलची पॅन्थर लाईन कंडक्टर्स(वायर्स) ८४० मिटर एकुण ८०,००० किंमतीची अज्ञात व्यक्तीने चोरुन नेल्या. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- रावसाहेब भानुदास शेंडे, वय ४३ वर्षे, रा. हरोली ता. कवठे, महाकाळ जि. सांगली ह.मु. एस टी कॉलनी तुळजापूर ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.०८.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन नळदुर्ग पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये स्वतंत्र ४ गुन्हे नोंदवले आहेत. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## कळंब येथून मोटरसायकलची चोरी

कळंब (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी पोपट आप्पासाहेब लोमटे, वय ५६ वर्षे, रा. जवळा खु. कळंब ता. कळंब जि.धाराशिव यांची अंदाजे २५,००० किंमतीची हिरो स्प्लेंडर प्लस काळ्या रंगाची मोटरसायकल क्र एमएच २५ झेड ७७६४ ही दि.०३.१२.२०२५ रोजी १३.३० ते १३.५० वा. सु. तहसील कार्यालय कळंब समोरील मोकळ्या जागेतुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- पोपट लोमटे यांनी दि.०९.१२.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन कळंब पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# शैक्षणिक साहित्य देऊन महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन



धाराशिव (प्रतिनिधी)- भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त विविध सामाजिक संस्थेच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येतात,बहुजन विद्यार्थी सामाजिक संस्थेच्या वतीने दरवर्षी एक वही एक पेन देऊन महामानवाला अभिवादन हा उपक्रम राबविण्यात येतो,या उपक्रमात भीम अनुयायी मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद देत बोधिसत्त्व डॉ बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करतात, जमा झालेल्या शैक्षणिक साहित्याचे वाटप गरजवंत विद्यार्थी व बुध्द विहारात दर रविवारी बुध्द वंदना झाल्यानंतर शालेय विद्यार्थ्यांना वाटप करण्यात येते,या उपक्रमात दरवर्षी प्रमाणे याही वर्षी सामाजिक कार्यकर्त्या आशाताई कांबळे यांनी वही पेन देऊन महामानवाला अभिवादन केले तर सेवानिवृत्त आदर्श शिक्षक बलभीम कांबळे त्यांच्या मुली डॉ क्रांती कांबळे,नालंदा कांबळे यांनी देखील शैक्षणिक साहित्य देऊन अभिवादन केले.यावेळी फुले शाहू आंबेडकर उद्यान कृती समितीचे अध्यक्ष गणेश वाघमारे, बहुजन विद्यार्थी सामाजिक संस्थेचे अध्यक्ष स्वराज जानराव,समता सैनिक दलाचे सचिन दिलपाक,अतुल लष्करे, सचिन तात्या बनसोडे अन्य इतर उपस्थित होते.

# मशिनरी व ड्रीप असोसिएशनच्या अध्यक्षपदी शहा व सचिवपदी शिंदे यांची निवड

धाराशिव(प्रतिनिधी)-शहरातील प्रतिष्ठेच्या समजल्या जाणार्या मशिनरी व ड्रीप असोसिएशनच्या अध्यक्षपदी शैलेश शहा व सचिवपदी श्रीकांत शिंदे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. नुकत्याच पार पडलेल्या असोसिएशनच्या बैठकीत ही निवड करण्यात आली. याप्रसंगी जिल्हा व्यापारी महासंघाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत जाधव, महाराष्ट्र कैटचे उपाध्यक्ष संजय मंत्री व मावळते अध्यक्ष अविनाश काळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी बोलताना व्यापारी महासंघाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत जाधव यांनी असोसिएशनच्या एकजुटीबध्दल व पारदर्शक कामाबद्दल कौतुक करून व्यापारी महासंघ सोबत नेहमीच आहे, असे आश्वासन दिले. मावळते अध्यक्ष अविनाश काळे यांनी आपल्या कार्याचा आढावा मांडला व कार्यकाळातील सहकार्याबद्दल सर्वांचे आभार मानले.

नूतन अध्यक्ष शहा यांनी विविध समस्यांचा उहापोह करून अडचणींवर उपाय काढण्याचे आश्वासन दिले. व सर्वांना सहकार्याची विनंती केली. याच बैठकीत उपाध्यक्षपदी मिलींद गांधी, किरण खडके तर कोषाध्यक्षपदी सुहास मंडगे यांची तर सहसचिवपदी दिगंबर सारडे यांची निवड करण्यात आली. कार्यकारी सदस्यांमध्ये कुणाल मेहता, नितीन देशमुख, नरेंद्र कुलकर्णी, गिरीष अष्टगी, नामदेव चव्हाण, ओनराम चौधरी यांची निवड करण्यात आली.

सर्व नवनिर्वाचित सदस्यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास शहरातील व्यापार्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नितीन देशमुख तर आभार श्रीकांत शिंदे यांनी मानले.

# जिल्ह्यात १७,४८५ शेतकऱ्यांकडून महाविस्तारचा वापर

धाराशिव (प्रतिनिधी)- शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, कृषी सल्ला आणि विविध योजनांची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध होण्यासाठी कृषी विभागातर्फे विकसित केलेले महाविस्तार ॲप शेतकऱ्यांसाठी डिजिटल वरदान ठरत आहे. जिल्ह्यात सोमवारपर्यंत (दि. ८) धाराशिव जिल्ह्यातील १७,४८५ शेतकऱ्यांनी महाविस्तार ॲप डाऊनलोड केले आहे. दि.१६ नोव्हेंबरपर्यंत ५०३० शेतकऱ्यांनी हे ॲप डाउनलोड केले होते. त्यानंतर कृषी विभगाकडून गावोगावी मोहीम राबवल्याने प्रगतशील शेतकऱ्यांसह अनेक शेतकरी महाविस्तार ॲपकडे सकारात्मक पाहत असल्याचे प्रभारी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी महादेव आसोलकर यांनी सांगितले. डिसेंबरपर्यंत प्रत्येक गावातील किमान २० टक्के शेतकऱ्यांनी हे ॲप डाऊनलोड करून सक्रिय वापर करावा, असे उद्दिष्ट निश्चित केले आहे. महाविस्तार ॲप हे एआयवर आधारित असून, शेतकऱ्यांच्या विशिष्ट ओळख क्रमांकाद्वारे लॉग-इन करून वैयक्तिक आणि शेतकरी-केंद्रित सेवा पुरवते. मराठी एआय चॅटबॉट शेतीसंबंधी प्रश्नांचे त्वरित निरसन होणार आहे. हवामान अंदाज व बाजारभाव रिअल टाइममध्ये उपलब्ध होत असल्याने पेरणी, कापणी आणि विक्रीचे योग्य नियोजन, कृषी योजना, अनुदाने, विमा योजनेची सविस्तर माहिती यावर मिळेल. पीक व्यवस्थापन, खत नियोजन, कीड-रोग नियंत्रणासह आधुनिक शेतीचे मार्गदर्शनाचे मराठी व्हिडिओही उपलब्ध आहेत. उद्दिष्टपूर्तीसाठी जिल्हा कृषी विभाग सक्रिय झाला असून, गाव स्तरावर सहायक कृषी अधिकाऱ्यांमार्फत बैठका घेत ॲपचे महत्त्व सांगितले. आहे. प्र. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आसोलकर यांनी तालुका कृषी अधिकाऱ्यांसह अंमलबजावणीच्या सूचना दिल्या आहेत. 'महाविस्तार एआय' प जीपीएसद्वारे शेतकऱ्याला स्थानिक हवामान व जमिनीची स्थिती तपासून केवळ पुस्तकी सल्ला देत नाही. तर आता 'जीपीएस'द्वारे शेतकऱ्याच्या शेतीचे ठिकाण शोधून तेथील स्थानिक हवामान व जमिनीची स्थिती तपासून सल्ला मिळणार आहे. शेतकऱ्यांना स्थानिक हवामान अंदाज देईल.

# वाशीतील धाराशिव पब्लिक स्कूल परिसरात भरला आनंदी बाजार



वाशी(प्रतिनिधी)-धाराशिव पब्लिक स्कूल (इंग्रजी माध्यम), वाशी येथे मंगळवारी (दि. ९) चिमुकल्या विद्यार्थ्यांचा 'आनंदी बाजार' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. नर्सरीपासून ते इयत्ता पाचवीपर्यंतच्या तब्बल १८० विद्यार्थ्यांनी खाद्यपदार्थ, स्टेशनरी, कपडे, भाजीपाल्यासह आदी दैनंदिन गरजेच्या वस्तूंची आकर्षक दुकाने मांडली होती. या बाजारात ४ तासात विद्यार्थ्यांनी ७१ हजारांपर्यंतची उलाढाल केल्याचे दिसून आले. शाळेच्या परिसरात विद्यार्थ्यांनी उभारलेल्या या छोटेखानी बाजाराला पालक, गावातील महिला आणि तरुणांनी मोठ्या प्रमाणात भेट देत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

व्यवसाय कौशल्य आत्मसात करण्याच्या हेतूने आयोजित केलेल्या या उपक्रमात चिमुकल्यांनी आठवडी बाजाराप्रमाणे ग्राहकांना हाक देत वस्तूंची विक्री केली. पाणीपुरी, भेळ, वडापाव, पुलाव, पावभाजी, ढोकळा, डोसा, केक यांसारखे स्वादिष्ट पदार्थांसह मेथी, वांगी, बटाटे, भोपळा अशा भाजीपाल्याचीही दुकाने काही विद्यार्थ्यांनी थाटली होती. परिसरात वेगवेगळ्या खाद्यपदार्थांचा सुगंध दरवळत असल्याने बाजाराची रंगत आणखी वाढली. पालक व नागरिकांनी चिमुकल्यांच्या कल्पकतेचे आणि मेहनतीचे कौतुक करत त्यांच्याकडून वस्तूंची खरेदी केली. चार तास चाललेल्या या बाजारातून ७१ हजार रुपये पेक्षा अधिकची आर्थिक उलाढाल झाली. लहान वयातच व्यवहारज्ञान आणि व्यावसायिक कौशल्य विकसित व्हावे, या उद्देशाने शाळेकडून हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन नगरपंचायत नगरसेविका वंदना कवडे, तालुका व्यापारी संघटनेचे अध्यक्ष मुकुंद शिंगणापुरे, तसेच संस्थेचे संजय दशवंत आणि शिवशंकर चौधरी यांच्या हस्ते करण्यात आले. शाळेच्या या प्रयत्नाचे आणि विद्यार्थ्यांच्या सहभागाचे पालकावर्गातून कौतुक होत आहे. यावेळी सर्वांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

शिक्षणासोबत व्यवसायज्ञान धाराशिव पब्लिक स्कूलमध्ये झालेल्या 'आनंदी बाजारात' १८० विद्यार्थ्यांनी खाद्यपदार्थ, स्टेशनरी, कपडे व भाजीपाल्याची दुकाने उभारून व्यवहारज्ञानाचा प्रत्यक्ष सराव केला. ग्राहकांना हाक देणे, दर सांगणे, रक्कम मोजणे अशा कौशल्यांचा चिमुकल्यांनी आनंदाने अनुभव घेतला. पालकांच्या मोठ्या सहभागामुळे चार तासांत ७१ हजारांची उलाढाल होऊन बाजाराची रंगत वाढली.

# मध्यवर्ती सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीच्या अध्यक्षपदी आकाश कोकाटे यांची निवड



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- धाराशिव शहरातील मध्यवर्ती सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीच्या अध्यक्षपदी आकाश मिलिंदराव कोकाटे यांची हॉटेल रोमा येथे दि.१० रोजी घेण्यात आलेल्या बैठकीत एकमताने निवड करण्यात आली असून त्यांच्या निवडीमुळे यंदाचा शिवजयंती महोत्सव अधिक भव्य, शिस्तबद्ध आणि जनसहभागातून साजरा होईल, असा विश्वास समितीच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. गेली ३६ वर्षे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासात ठसा उमटवणारा हा महोत्सव यावर्षी नव्या उपक्रमांनी समृद्ध करण्याचे संकेतही बैठकीतून देण्यात आले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा गौरव करताना पदाधिकाऱ्यांनी नमूद केले केले,

धैर्य, शौर्य व दूरदृष्टीचे तेजस्वी प्रतीक, न्याय, समानता व स्वाभिमानाचे अधिष्ठान उभारणारे जननायक, हिंदवी स्वराज्याचे स्वप्न प्रत्यक्षात साकार करणारे अद्वितीय नेतृत्व, आणि जनकल्याणाला सर्वोच्च मानणारा प्रेरणास्रोत म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज. या प्रेरणादायी मूल्यांना अधोरेखित करणारे सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि समाजजागृतीपर कार्यक्रम आकाश कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली राबवून शिवजयंतीला अधिक अर्थपूर्ण आणि स्मरणीय स्वरूप देण्याचे नियोजन समितीकडून करण्यात येत आहे.

यावेळी समितीचे मार्गदर्शक प्रकाश जगताप,विश्वास शिंदे,भारत कोकाटे, जयंत पाटील,बाळासाहेब शिंदे,दत्ता बंडगर,नाना निंबाळकर,अमित शिंदे,अनंत उंबरे,भारत इंगळे, मसूद शेख ,खलिफा कुरेशी , नादेर हुसेनी ,सय्यद खलील सर,प्रदिप साळुंके,चंद्रकांत मुंडे, मिलिंदराव कोकाटे,शमी मशायक यांचे सह समितीचे सर्व पदाधिकार माजी अध्यक्ष शिवप्रेमी उपस्थीत होते .

# जागतिक एड्स दिन पंधरवडा निमित्त जनजागृती कार्यक्रम

कळंब(प्रतिनिधी)-अडथळ्यावर मात करू, एकजुटीने एचआयव्ही/ एड्स ला लढा देऊ, नव परिवर्तन घडवू या घोषवाक्यास अनुसरून मा.डॉ धनंजय चाकूरकर सर जिल्हा शल्य चिकित्सक धाराशिव, डॉ नागनाथ धर्माधिकारी वैद्यकीय अधीक्षक उपजिल्हा रुग्णालय कळंब , श्री उद्धव कदम जिल्हा कार्यक्रम अधिकारी व श्री महादेव शिनगारे जिल्हा पर्यवेक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक एड्स दिन पंधरवाडा निमित्त आयसीटीसी विभाग उपजिल्हा रुग्णालय कळंब यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाविद्यालय कळंब व ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय कळंब येथे जागतिक एड्स दिन साजरा करण्यात आला. यावेळी छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. माने सर, प्रा.जगताप सर,प्रा. गंभीरे सर, एन एस एस विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा. कळसकर मॅडम व मोहेकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ हेमंत भगवान सर, एन एस एस विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा. ताटीपामूल सर, प्रा चांदोरे सर, प्रा महाजन सर , प्रा मुखेडकर मॅडम,अरविंद शिंदे सर व इतर प्राध्यापक वर्ग उपस्थित होते. तसेच या कालावधीत रेणुका फाउंडेशन ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट कळंब व योगेश्वरी बीएससी नर्सिंग कॉलेज डिकसळ यांनी कळंब शहरातून *एच आय व्ही /एड्स विषयी जनजागृती पर रॅली काढली. तसेच कॉलेजमधील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी बस स्थानक परिसरात व शहरातील मुख्य रस्त्यावर व रुग्णालय परिसरात एच आय व्ही/ एड्स संक्रमणाचे मार्ग व प्रतिबंधात्मक उपाय तसेच मादक द्रव्यांचे सेवन व त्याचे दुष्परिणाम* या विषयावर एच आय व्ही एड्स बद्दल पथनाट्य सादरीकरण करून जनजागृती केली. या दिनानिमित्त उपस्थित युवक युवतींना एचआयव्ही एड्स बद्दल सविस्तरपणे माहिती देऊन जागतिक एड्स दिनाची शपथ देण्यात आली. यावेळी रेणुका कॉलेजचे संचालक शरद जाधवर, प्राचार्य जाधवर मॅडम, श्रीमती झांबरे मॅडम , योगेश्वरी बीएससी नर्सिंग कॉलेजचे संचालक श्री महेश इटकर, अर्चना इटकर हनुमान राठोड (प्राचार्य), अतुल मगर (शिक्षक), ओंकार निंबाळकर (शिक्षक) व इतर प्राध्यापक वर्ग उपस्थित होते. अशा रीतीने कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ एम यू शेळके , डॉ शरद दशरथ,आयसीटीसी विभागाचे श्रमती प्रगती भंडारी ,श्री परशुराम कोळी , श्री ईश्वर भोसले, रुग्णालयातील तानाजी कदम, शिवशंकर वीर, लक्ष्मीकांत मुंडे व इतर अधिकारी व कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था तालुका धाराशिव यांचे समोर**
**मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, रुम नं. २, धाराशिव**
**जाहीर समन्स**

जा.क्र.: ३०४३/२०२५ दिनांक ०५/१२/२०२५

**(महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये)**

**उस्मानाबाद अर्बन को-ऑपरटिव्ह क्रेडीट सोसायटी लि. स्था मर्या येडशी,** लातूर - बार्शी रोड, येडशी, ता. जि. धाराशिव. यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनीयम १९६० चे कलम १०१ अन्वये कर्जदार व त्यांचे जामिनदार यांचे कडुन थकीत रक्कम वसुल करुन मिळणे करीता वसुली दाखला मिळावा. म्हणुन अर्ज दाखल केला आहे. त्यानुसार सदर दाव्याची सुनावनी **दिनांक: २४/०९/२०२५ दिनांक: २९/१०/२०२५; दिनांक:१८/११/२०२५; दिनांक:०५/१२/२०२५** रोजी माझ्या कार्यालयात ठेवण्यात आली होती. सुनावणीच्या नोटीसेस नोंदणीकृत टपालाने पाठविण्यात आलेल्या होत्या. काही कर्जदार/जामिनदार यांनी सदरच्या नोटीसेस परत केल्या व काहीच्या नोटीसा परत आल्या आहेत. नोटीसेस स्विकारुन सुध्दा सुनावणीस हजर राहिले नाहीत. गैरअर्जदार यांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी या कार्यालयात **दिनांक: १७/१२/२०२५ रोजी दुपारी ०१:०० PM** वाजता सदर दाव्याची सुनावणी ठेवण्यात आली आहे. त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी ही संधी देण्यात येत आहे. त्यानुसार खालिल कर्जदार व जामिनदार यांना कळविण्यात येते की, त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी त्यांनी वरील नमुद केलेल्या तारखेस माझ्या कार्यालयात हजर राहावे. आपण सदर सुनावणीस हजर न राहिल्यास आपले काहीही म्हणने नाही, असे गृहीत धरुन पुढील कारवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी. ही नोटीस **दिनांक:- ०५/१२/२०२५** रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह दिली आहे.

| अ. क्र. | दावा क्र. | कर्जदाराचे नाव व जामीनदाराची नाव | पत्ता | दाव्याची रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | ५५५/२०२५ | कर्जदार- मिथुन भारत ओव्हाळ | मु. पो. येडशी, ता. जि. धाराशिव | ४०,६९८/- |
| | | जामीनदार- राहुल दत्तू मस्के | मु. पो. येडशी, ता. जि. धाराशिव | |
| | | जामीनदार- सागर महादेव कांबळे | मु. पो. येडशी, ता. जि. धाराशिव | |
| २. | ५५६/२०२५ | कर्जदार- दत्तात्रेय ज्ञानदेव पवार | मु. पो. येडशी, ता. जि. धाराशिव | २४,०५१/- |
| | | जामीनदार- राहुल दशरथ पवार | मु. पो. येडशी, ता. जि. धाराशिव | |
| | | जामीनदार- सुजित दत्तात्रय पवार | मु. पो. येडशी, ता. जि. धाराशिव | |
| ३. | ५५७/२०२५ | कर्जदार- वनमाला रामलिंग जानराव | मु. पो. येडशी, ता. जि. धाराशिव | ३,४३,६७७/- |
| | | जामीनदार- राजेश रामलिंग जानराव | मु. पो. येडशी, ता. जि. धाराशिव | |

कोर्ट शिक्का

**स्वाक्षरित/-**
**सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था तालुका धाराशिव**

# गोवंशीय जनावरांची कत्तल करणाऱ्यावर गुन्हा दाखल

परंडा पोलीस ठाणे अंतर्गत गौस वय ३८ वर्षे, रा. कुरेशी गल्ली परंडा ता. परंडा जि.धाराशिव यांनी दि.०६९१२.२०२५ रोजी ०५.३० वा. सु.लालमिया कुरेशी यांच्या घराच्या उत्तर बाजूस कुरेशी गल्ली परंडा येथे गोवंशीय जातीचे जनावरे कापून त्याचे कातडे सोलत असताना एकुण २,३१,००० किंमतीचे मुद्देमालासह परंडा पोलीसांना मिळून आले.

यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुध्द कलम ५(क),९, ९(अ) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

# हणमंत शेटे यांचे दु:खद निधन



धाराशिव (प्रतिनिधी) - तालुक्यातील उपळे (मा) येथील हणमंत भिमराव शेटे ( वय - ८९ ) यांचे मंगळवार दि .९ डिसेंबर रोजी पहाटे ५:३० वाजण्याच्या सुमारास वर्धापकाळाने दु:खद निधन झाले. त्यांचा अंत्यविधी उपळे (मा) येथे करण्यात आला. यावेळी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात २ मुले, ४ मुली, सुना, नातवंडे, जावई, ३ भाऊ , १ बहिन असा मोठा परिवार आहे. ते पत्रकार संतोष शेटे यांचे वडील होते.

**लातूर समाचार धाराशिव**
**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**
**9422472502**
**9175325708**

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५)
२२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.
Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649

